# संदर्भ ग्रंथसूची

# संदर्भ ग्रंथसूची


| | | | |
|---|---|---|---|
| १. | इनामदार प्रकाश | : | हृदयस्पर्शी 'कोकरउड्या', दै. प्रभात, दि. २५ जुलै १९९३ |
| २. | कऱ्हाडे सदा | : | 'चरित्र आत्मचरित्र', लोकवाङ्मयगृह, १९७६ |
| ३. | कुंसरे कुलकर्णी आरती | : | 'दलित स्वरूप कथले', साहित्य रूप, प्रथम आवृत्ती, १९९१ |
| ४. | कुलकर्णी अरविंद वामन | : | 'प्रा. व. बा. बोधे यांच्या कादंबऱ्या', 'एक अनावृत्त पत्र', महाराष्ट्र साहित्य पत्रिका, १९८१ |
| ५. | घारे दिपक | : | महाराष्ट्र टाईम्स, ८ ऑक्टोंबर, १९७८ |
| ६. | जाधव रा. ग. | : | 'नीळी पहाट', श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९७८ |
| ७. | जाधव विलास | : | एक हृदय कथोपकथा 'फीस्ट', महाराष्ट्र साहित्य पत्रिका, डिसेंबर १९७८ |
| ८. | जोशी अ. म. | : | 'चरित्र-आत्मचरित्र', सुविचार प्रकाशन, १९३६ |
| ९. | ठाकूर रवींद्र | : | 'मराठी ग्रामीण कादंबरी' (१९८०-१९९०) |
| १०. | डहाके वसंत आबाजी | : | 'शालेय शब्दकोश' मराठी, २००२ |
| ११. | धर्माधिकारी पुरुषोत्तम दिगंबर | : | 'वाङ्मयीन सिद्धांत', अजब प्रकाशन, १९७८ |
| १२. | नलगे चंद्रकुमार (गंगाधर पानतावणे) | : | 'दलित आत्मकथन प्रस्तावना', सुरेश एजन्सी, पुणे, १९८६ |
| १३. | पवार दया | : | १७ ऑगस्ट १९७८ चे पत्र 'रानपालवी', संस्कृती प्रकाशन, पुणे, जानेवावरी २००२ |
| १४. | पाटणे यशवंत | : | 'रानपालवी गावरम्य शैलीत साकारलेली अक्षरयात्रा', दै. पुढारी, ३१ ऑगस्ट २००३ |
| १५. | बोरगावकर व. रा. | : | 'प्राचीन मराठीतील चरित्रलेखन', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९७८ |
| १६. | बोधे व. बा. | : | 'मी व माझे साहित्य', म. स. पा. ग्रामीण साहित्य विशेषांक, पुणे १९८०, जुलै ते डिसेंबर |

१७. बोधे व. बा. : 'फुल चुकीच्या निमित्ताने फुल चुकी' प्रथमावृत्ती, २००३

१८. बोधे व. बा. : 'वैखरीचा वारकरी', अक्षरबंध प्रकाशन, प्रथमावृत्ती २००४

१९. बोधे व. बा. : 'मी व माझे साहित्य', महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जुलै-डिसेंबर १९७९

२०. बोधे व. बा. : 'अक्षरबंध प्रकाशन रविकिरण निरा', द्वितीय आवृत्ती २००६

२१. बोधे व. बा. : 'रानपालखी', संस्कृती प्रकाशन, पुणे, जानेवारी २००३

२२. भालेराव विमल : 'आधुनिक मराठी वाङ्मय यांतील स्त्रियांचे आत्मचरित्रे एक अभ्यास', साहित्य प्रसार केंद्र १९८५

२३. भोसले द. ता. : 'नवभारत' आक्टोबर १९७८

२४. भोसले सुधाकर : 'रानपालखी नव्हे रानफळ', एक शोधनिबंध, दै.पुढारी, ३१ ऑगस्ट २००३

२५. मुलाटे वासुदेव : 'सहा दलित आत्मकथने एक मुक्त चिंतन कैलास' १९८५

२६. येडगे शंकरानंद : 'ग्रामीण मनाचे जिवंत दर्शन घडविणारी आत्मकथा', दै. ग्रामोद्धार, रविवार दि.१०/१०/१९९३

२७. यादव आनंद : दि. ३/८/१९९३, २२/४/७९ चे पत्र (व. बा. बोधे यांच्या वैयक्तिक संग्रहातून)

२८. रांगणेकर प्रभा : 'फिस्ट', प्रस्तावना, मयुर प्रकाशन, प्रथम आवृत्ती, १९७७

२९. साठे आ. वि. : 'साहित्यात रमलेल्या प्राध्यापकाचे आत्मकथन' दै. तरुण भारत, रविवार १३ जुलै २००३

३०. सारडा शंकर : 'चंदनबटवा', प्रथमावृत्ती १९९९ मलपृष्ठ


----x----

# परिशिष्ट्ये

# परिशिष्ट क्र. १

## व. बा. बोधे यांची अभ्यासकाने घेतलेली मुलाखत.

प्रा. व. बा. बोधे यांची मी समक्ष मुलाखत घेतली. एका समर्थ ग्रामीण लेखकांशी केलेल्या चर्चेतून घडलेला सहजसंवाद पुढीलप्रमाणे -

शेडगे : नमस्कार सर.

प्रा. बोधे : नमस्कार.

शेडगे : सर ... मी आपल्या 'कोकरउड्या' व 'रानपालखी' या दोन आत्मकथांवर शिवाजी विद्यापीठात एम. फिल. करतोय. यानिमित्ताने आपली मुलाखत हवीय.

प्रा. बोधे : प्रथम मी आपलं अभिनंदन करतो. दर्जेदार लेखन करूनही प्रस्थापित समीक्षाव्यवस्थेनं जाणीवपूर्वक दूर ठेवलेल्या ग्रामीण लेखकाच्या आत्मकथांवर संशोधन करावे असे तुम्हास वाटले हीच माझ्या दृष्टीने कौतुकाची बाब आहे. ग्रामीण साहित्याच्या विद्यमान समीक्षेची पुनर्मांडणी करणे गरजेचे आहे. आणि ही जबाबदारी तुमच्या-सारख्या नव्या उगवत्या अभ्यासकांवर आहे.

शेडगे : सर आपली जन्मभूमी आणि कर्मभूमी कोणती ?

प्रा. बोधे : माझा जन्म सांगली जिल्ह्यातील अंकलखोपचा. मी मळ्यात वाढलो. त्यामुळे अंकलखोप या गावाशी माझा कधी दुरान्वयानेही संबंध आला नाही. माझं मूळ गाव सातारा जिल्हयातील, कोरेगांव तालुक्यातील दुधी. कोणत्याही आमदाराच्या नकाशात नसलेलं गाव. कर्मभूमी म्हणाल तर पुणे जिल्ह्यातील नीरा.

शेडगे : आपण लेखनाकडे कसे वळलात ?

प्रा. बोधे : याचे श्रेय माझ्या वडीलांना आहे. वडीलांनी आम्हा बंधुंना वाचनाची गोडी लावली. मी चौथीत असताना आमच्या घरी 'मुलांचे मासिक' यायचं. वडील स्वत: 'किर्लोस्कर'चे वर्गणीदार होते. त्यांनी गावात एक नाटक कंपनीही स्थापन केली होती. घरात सतत नाटकांची पुस्तके असत. थोरला भाऊ हायस्कूलमधून कथा-कादंबऱ्या वाचायला आणायचा. यातून वाचनाची चटक लागली. अवांतर वाचन गतीमान झाले की नकळत माणूस लेखनाकडे वळतो.

शेडगे : तुमचे आवडते लेखक कोण ?

प्रा. बोधे : मी सहावीत असताना म. भा. भोसले यांना प्रथम पाहिलं. पुढे गाठीभेटी वाढतगेल्या. त्यांचे संपूर्ण वाङ्मय की कॉलेजला असतानाच वाचून काढलं. पुढं दीघे, माटे, ठोकळ, पाटील, यादव यांच्या साहित्याची चटक लागली. जास्त आवडतात ते शंकर पाटील, आनंद यादव.

शेडगे : अनेक चांगल्या लेखकांची उपेक्षा झालीय असं तुम्हास वाटते का ?

प्रा. बोधे : होय. म. भा. भोसले यांना समीक्षकांनीउपेक्षितच ठेवलं. बाबा पाटलांसारखा समर्थ कथाकार गांधारीचं मतलबी आंधळेपण स्वीकारलेल्या समीक्षकांना दिसलांच. नाही. चि. य. मराठे, शामराव ओक बाजुलाच पडलेत. कथा स्पर्धेतून पुढे आलेले अनेक लेखक नंतर लेखन संन्यास घेतात किंवा अकाली विजनवासात जातात. त्यांच्या संकलीत न झालेल्या साहित्याचं काय ? एकट्या कोल्हटकरांनीच ते वाचायचं ? आपली काहीच नैतिक जबाबदारी नाही ?

शेडगे : नव्या, उगवत्या लेखकांना आपला फार आधार वाटतो.

प्रा. बोधे : खरं आहे. नव्या, उगवत्या लेखकांना प्रकाशाची वाट दाखविणे मी माझे कर्तव्य मानतो. पण नवोदित लेखकांनीही सतत पांगुळगाडा वापरायची गरज नाही. वाचन, श्रवण,संवाद ही तीन कौशल्ये लेखकांनी प्रथम हस्तगत करावी. मग लेखन कौशल्याकडे वळावे. केवळ कुतुहलापोटी अक्षरांच्या प्रदेशात शिरू नये. खरा अंतरीचा उमाळा अक्षरबद्ध व्हायला वेळ लागत नाही.

शेडगे : आपल्या लेखन प्रवासाबद्दल सांगा ना थोडं ?

प्रा. बोधे : मी कथा स्पर्धेतून पुढे आलो. विद्यार्थी दशेत 'तरुण भारत', 'किर्लोस्कर', 'अस्मिता दर्श' या कथा स्पर्धा मी जिंकल्या. प्रारंभी माझ्या काही कथा 'प्रतिष्ठान' या नियतकालिकातूनही आल्या. या सगळ्या कथा 'फीस्ट' या कथासंग्रहात आहेत.

शेडगे : ग्रामीण लेखकांना प्रकाशक भेटायला अनंत अडचणी येतात, हे खरंच आहे का ?

प्रा. बोधे : हे खरं नाही. दर्जेदार वाङ्मयाच्या शोधात प्रकाशक सतत असतात. आमचे लेखकच आळशी असतात. वाङ्मयीन नियतकालिकांचे वाचन शून्य असते. गंभीर वाचनापेक्षा

पटकन पुस्तक छापण्याकडे जास्त कल. लिहिलेल्या कथा, कविता नियतकालिकातून छापून याव्यात. मग निवड करावी. जाणकारांचा अभिप्राय घ्यावा. ही वृत्तीच नाही. कवी तर फारच उतावळे. फटाफटा कविता लिहितात. डायरेक्ट काव्यसंग्रह छापतात. हे लोक पिठाच्या गिरणीत गेले तर धान्य गिरणीत टाकल्यानंतर डायरेक्ट डब्यात भाकरीच पडावी अशी अपेक्षा करतील. वाट पाहण्याइतका संयम नाही. कवितेच्या प्रांतात तर बनचुक्यांचेच राज्य आलंय. कवी काय आणि लेखक काय ? आधी साहित्याला वृत्तपत्रीय पुरवण्या, नियतकालिके यातून प्रकाशाची वाट दाखवावी. मग शेकडो अंकातून निवडक साहित्य निवडावे. पण आता वाट बघण्याइतका कोणालाच वेळ नाही. सगळं इन्स्टंट हवंय.

शेडगे : ग्रामीण साहित्य चळवळीबद्दल सांगा ना थोडं !

प्रा. बोधे : ही चळवळ आनंद यादवांनी सुरू केली. १९७७ साली पतंगराव कदम यांच्या सहकार्याने पहिला ग्रामीण लेखकांचा मेळावाही घेतला. शांता शेळके, ग. ल. ठोकळ, शंकरराव खरात, उद्धव शेळके, ग. वा. बेहेरे, द. ता. भोसले अशी अनेक मातब्बर माणसं आली होती. पण या चळवळीतून लेखक किती घडले ही शंकाच आहे. निर्माण झाले ते यादव-बोराडे यांचे स्तुतीपाठक. अभ्याक्रमात आपले साहित्य लावणारी फौज निर्माण करण्यापलिकडे कोणीच काही केले नाही. आता तर चळवळ थंडावलीय. तीस-बत्तीस वर्षात चळवळीला स्वत:चं मुखपत्रही काढता आलं नाही. सगळ्याच वाङ्मयीन चळवळींच्या सुतगिरण्या झालेत. नव्या लेखकांनी जिथं आशेने जाऊन बसावे असा एकही वाङ्मयकट्टा दिसत नाही.

शेडगे : अखिल भारतीय साहित्य संमेलनात दिसत नाही तुम्ही ?

प्रा. बोधे : कसा दिसणार ! साहित्य महामंडळ आणि स्थानिक संस्था ही संमेलने भरवितात. शासनाकडून साहित्य संमेलनाला पंचवीस लाख रुपये मिळतात. बुकस्टॉल्सकडून लाखो रुपयांचे भाडे वसुल होते. निमंत्रित संस्था स्थानिक पातळीवर कोट्यावधी रुपयांचा निधी उभा करते. पण लेखकांना आणि कवींना हे लोक वेठबिगारागत राबवितात. एस. टी. च्या भाडेखर्चावर आणि पाचशे रुपये मानधनावर लेखक पळत येतात कवी तर भलतेच हपापलेले. पंचवीस रुपये दिले तरी पळत येतात. खळे

उलगडल्यावर भेटेल त्याला हजारों रुपये मिळाल्याचं खोटेच सांगतात. काही कथा-कथनकार तर अशा मोठ्या मेळाव्यात प्रसिद्धी मिळवितात आणि नंतर वर्षभर गावगाव वठवतात.सिनेमावाले जसा सिनेमाचा फायदा रंगभूमीवर घेतात. तसाच हा प्रकार. आता रंगभूमीऐवजी मंडळी मालिकांकडे वळायला लागलीय. एवढाच फरक.

शेडगे : गेल्या आठ वर्षात तुमच्या लेखनाचं स्वरूप बदललंय. खरे आहे ते ?

प्रा.बोधे : खरं आहे. कादंबरी लेखन मी केव्हाच बंद केलंय. कथालेखनही थांबवलंय.आता ललित गद्याकडे वळलोय. 'चंदनबटवा', 'वैखरीचा वारकरी', 'फुलचुखी', 'वृक्ष माझे सोबती', 'कंदिलाचे दिवस', 'घराघराचं रूप आगळे' असं दर्जेदार लेखन लेखणीतून उतरतंय. समाधान आहे. आत्मचरित्राच्या अंगाने जाणारे असे व्यापक प्रमाणावरील ललित गद्यलेखन एकाही ग्रामीण लेखकाने केले नाही. समीक्षकांना याची दखल घ्यावीच लागेल.

शेडगे : आपल्या आत्मचरित्रांबद्दल सांगा ना ?

प्रा. बोधे : मी काय सांगू ? तुम्ही वाचली आहेत ती. मी आत्मचरित्र असा शब्द न वापरता 'आत्मकथा' असा शब्द वापरलाय. तोच मला योग्य वाटतो. थोर व्यक्तींनी आपल्या आत्मकथनास आत्मचरित्र असा शब्द योजला तर ते मी समजू शकतो. पण नेहरु, गांधी यांनीही आपल्या आत्मचरित्रांना 'आत्मकथा' असाच शब्द योजलाय.

शेडगे : सिनेमाकडे वळला नाहीत कधी ?

प्रा. बोधे : ते दिग्दर्शकाचं क्षेत्र आहे. १९५० ते १९७५ पर्यंत तेथे लेखकांना सन्मानाचं स्थान होतं. अत्रे, खांडेकर, फडके, शंकर पाटील, माडगूळकर बंधू यांच्या कथा, संवाद, लेखनाला महत्त्व होतं. आता जातिवंत लेखकांची हकालपट्टी झाली. भाडोत्री बनचुक्यांना महत्त्व आलंय. सगळीकडे त्यांचीच सद्दी आहे. आत निर्माते वाचतच नाहीत. चोराचोरीला उत आलाय. तरीही एकाद्या सिनेमासाठी लिहावं अशी इच्छा आहे.

शेडगे : सध्या काय लिहिताय ?

प्रा. बोधे : सध्या ललित लेखन. दुसरं काय. पण लेखनापेक्षा वाचनातच जीव रमतो. आता निवृत्ती झालोय. तब्येतीनं जगतो. मला घिसाडघाईचं, धावपळीचं जगणं आवडत

नाही. मुंगी कशी वारुळ धरून राहते तसा मी घर धरून राहतो. मी आयुष्य चवीनं जगणारा माणूस आहे. दगदग मला सहन होत नाही.

शेडगे : फर्डे वक्तृत्व हा तुमचा आणखी एक पैलू. त्याबद्दल सांगा ना ?

प्रा. बोधे : प्रभावी वक्तृत्वाचा मी नेहमीच भुकेला. चांगला वक्ता व्हावं असं मला मनापासून वाटायचं. पण नुसतं तसं वाटून उपयोग नाही. त्यासाठी दमदार वक्तृत्व ऐकायला हवं मी. बॅ. नाथ पै ऐकले. पु. ल. ऐकले. शिवाजीराव भोसले ऐकले. यशवंतराव चव्हाण ऐकले. विद्यार्थी दशेतच साहित्य संमेलनांना हजेरी लावायचो. त्यामुळे नाना प्रकारचे लेखक ऐकायला मिळाले. भावे, माडगूळकर, मिरासदार, भिमराव कुलकर्णी, शं. ना. नवरे असे कितीतरी वक्ते ऐकले. पण मला प्रभावी वाटले नरहर कुरुंदकर, प्रभाकर पाध्ये आणि विठ्ठलराव घाटे. असे अभ्यासू वक्ते आता दिसत नाहीत. सर्वत 'कंपोज्ड' वक्त्यांचा सुळसुळाट झालाय. औरंगजेबाने दिला नसेल एवढा त्रास शिवाजी-संभाजीला द्यायला लागलेत. आता आंतरीक तळमळीपेक्षा भडक नाट्य प्रभावी ठरू लागलंय.

शेडगे : धन्यवाद ! आपण वेळ काढून मुलाखत दिलित त्याबद्दल आभारी आहे. नमस्कार !

प्रा. बोधे : नमस्कार, आपल्या संशोधनास माझ्या शुभेच्छा !

----x----

# परिशिष्ट क्र. २

## व. बा. बोधे यांना मिळालेले विविध सन्मान (Others Honours)

१. ५ व ६ मे १९७७ रोजी पुणे येथे भारती विद्यापीठात भरलेल्या ग्रामीण साहित्यिक मेळाव्यामध्ये 'कथाकथन' विभागात सहभाग.

२. जळगाव येथे ६ जुलै १९९१ रोजी झालेल्या मराठा साहित्य संमेलनात मुलाखत, कथाकथन, परिसंवाद अशा विविध कार्यक्रमांत सहभाग.

३. १९ ऑगस्ट २००१ रोजी पलूस, जि. सांगली येथील ग्रामीण साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद.

४. सांगोला येथे ११, १२ व १३ नोव्हेंबर १९९१ रोजी झालेल्या साहित्य संमेलनात 'कथाकथन' विभागात सहभाग.

५. सांगली येथे १७ मार्च २००३ रोजी भरलेल्या परिवर्तनवादी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद.

६. पलूस येथील साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद, २००४.

७. डोंगरी साहित्य संमेलन, पनुंब्रे, जि. सांगली, अध्यक्षपद, पृ.२००६

८. सलगरे, जि. सांगली येथे झालेल्या ग्रामीण साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद.

९. राजाळे, जि. सातारा येथे साहित्य संमेलनाचे सन्माननीय अतिथी म्हणून निमंत्रण.

१०. प्रवरानगर ग्रामीण साहित्य संमेलनात सहभाग (कथाकथन).

११. माचीगड साहित्य संमेलन, माचीगड, जि. बेळगाव : अध्यक्षपद.

१२. पुणे विद्यापीठ मराठी विभागाने आयोजित केलेल्या 'मायलेकरं' या आनंद यादव यांच्या दीर्घकाव्यावरील चर्चात्मक परिसंवादाचे अध्यक्षपद.

-----x-----

# परिशिष्ट क्र. ३

## व. बा. बोधे यांना मिळालेल पुरस्कार व गौरव (Awards and Facilitation)

१. 'तरुण भारत' वासंतिक कथा स्पर्धा पुरस्कार १९७४, १९७५, १९७७ सलग तीन वेळा (प्रथम). 'किर्लोस्कर' मासिकाच्या 'उद्याचे कथाकार' स्पर्धेत 'भर्ती' कथेसाठी प्रथम पुरस्कार प्रदान १९७४.

२. 'गराडा' कथेस 'अस्मितादर्श' नियतकालिकातर्फे अण्णा भाऊ साठे पुरस्कार १९७६.

३. सहकारी विश्व कथा स्पर्धा १९७६. 'रानवा' कथेस प्रथम पुरस्कार.

४. 'मायमराठी' नवी दिल्ली या नियतकालिकाचा 'उपाय' कथेस द्वितीय पुरस्कार.

५. सातारा येथे भरलेल्या अखिल भारतीय साहित्य १९९२ मधील लक्षवेधक पंचवीस पुस्तकांत 'शिकार' या कादंबरीची विद्याधर गोखले यांच्याकडून निवड.

६. 'कोकरउड्या' या आत्मकथेस १९९४ साली शांतिलाल बोरा ट्रस्ट, कोपरगाव यांचा ग्रामीण साहित्याचा राज्यपुरस्कार. रोख रुपये एक हजार आणि सन्मानचिन्ह.

७. 'कोकरउड्या' या आत्मकथेस सांगलीचा वसंतदादा साहित्यरत्न पुरस्कार, १९९४.

८. राष्ट्रीय विद्यार्थि संघटना, पुणे जिल्हा काँग्रेस कमिटी यांच्या वतीने 'आदर्श शिक्षक' म्हणून निवड. बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे मा. शरद पवार यांच्या हस्ते प्रशस्तिपत्र प्रदान (९ ऑक्टोबर १९९७).

९. ५ सप्टेंबर १९९८ रोजी पुणे येथे एकलव्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त.

१०. अखिल भारतीय जैन संघटना (नाना पेठ) पुणे यांचा आदर्श शिक्षक पुरस्कार, ५ सप्टेंबर १९९८.

११. आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान, पुरंदर यांचा 'आचार्य अत्रे पुरस्कार', १३ ऑगस्ट १९९९ रोजी प्रदान.

१२. शीतल प्रकाशन, पुणे यांचा 'स्वर्गीय बाबूराव ओहोळ स्मृती पुरस्कार' आणि मानपत्र, १४ डिसेंबर २००१ रोजी प्राप्त.

१३. 'चंदनबटवा' या ललित गद्यलेखनास कोल्हापूरचा शाहू पुरस्कार.

१४. 'चंदनबटवा' या ललित गद्यलेखनास शिवगिरिजा प्रतिष्ठान, कुर्डुवाडी यांचा स. ना. कदम पुरस्कार. (रु.५००० रोख व सन्मानचिन्ह).

१५. 'चंदनबटवा' या ललित गद्यलेखनास बापूसाहेब ढाकरे पुरस्कार, दर्यापूर, जि. अमरावती.

१६. 'फुलचुखी' या ललित गद्यलेखनास महाराष्ट्र शासनाचा 'मधुकर केचे पुरस्कार' मुंबई.

१७. 'वैखरीचा वारकरी' या ग्रंथास ना. ह. आपटे पुरस्कार, कोरेगाव, जि. सातारा २००५.

१८. १४ जानेवारी २००७ रोजी 'ई' टीव्हीवरून कथाकथन.

१८. 'गावाकडची माणसं' या ललित लेखनास कवी अनंत फंदी पुरस्कार, संगमनेर, ११ जानेवारी २००८.

१९. 'वृक्ष माझे सोबती', स्मिता पाटील पुरस्कार, शिरपूर, धुळे.

-----x-----